## घाटी प्रशासनातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराबाबत गळ्यात मडकं पाठीला झाडू बांधून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करणार

सविस्तर वृत्त पान ४ वर

www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-34 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, २७ एप्रिल 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4

# आमदार अनुराधा चव्हाण आणि मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी माझी सुपारी दिली- मंगेश साबळे

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील अप्पर विभागीय आयुक्त कार्यालयात मंगेश साबळे गळ्यात बार कोडची माळ घालून आले त्याप्रसंगी त्यांनी आमदार आमदार अनुराधा चव्हाण आणि त्यांचे पती अतुल चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप केले तसेच जीवे मारण्यासाठी सुपारी दिल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार अनुराधा चव्हाण आणि त्यांचे पती अतुल चव्हाण यांनी दोघांनी मिळून केलेला जो काही भ्रष्टाचार आहे तो त्याची सकल चौकशी करण्यात यावी, मागच्या दोन महिन्यापूर्वी स्कॅनर किंवा घोटाळ्याची जो अंबादास दानवे साहेबांनी विषय केला होता आणि चार आठवड्यात उत्तर देतो म्हणून सांगितलं होतं अतुल चव्हाण तिकडे गेले यांनी ते अंबादास दानवे साहेब तिकडे गेले अन् चार आठवडे तिकडे गेले. सामान्य माणसाला या ठिकाणी अंधारात ठेवून लाखो करोडोचे भ्रष्टाचार अतुल चव्हाण यांनी केले.

या निवेदनातून सन्माननीय विभागीय आयुक्त यांना सांगितले की या तालुक्यामध्ये





आमदार असताना पतीला आपण या ठिकाणी जिल्ह्यामध्ये नियुक्ती दिलीच कशी हे कुठे नियम ात बसतात आमदार पक्षाचं काम करत असताना आमच्या सरकारी टॅक्स मधून पैसा घेणारा हा अतुल चव्हाण ते आमदाराची पार्टी मजबूत करण्यासाठी त्या आमदाराचा राजकीय वरदस्त मजबूत करण्यासाठी मदत करतोय. पैशाच्या बॅगा घेऊन तो अतुल चव्हाण या ठिकाणी फिरतोय. याच्याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब आमचा आपल्याला प्रश्न आपण ही नियुक्ती भाजपचे आमदार निवडून यावेत, भाजपचे सदस्य निवडून यावेत, यासाठी दिलेले आहेत असं असताना आमच्या तालुक्यांमध्ये आमदार काम करत नसताना कुठल्याही शासकीय काम

> “या सर्व प्रकरणावर अतुल चव्हाण यांची बाजू समजून घेण्यासाठी त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता त्यांनी नेहमीप्रमाणे उत्तर न देता मौन बाळगले. त्यामुळे त्यांना याबाबत काय म्हणायचे ते कळू शकले नाही.

होत नसताना हे अतुल चव्हाण सामान्य माणूस जेव्हा सामान्य माणसाच्या समस्या विषयी या आमदाराला प्रश्न विचारते तेव्हा हे धमकी देण्याचा काम करताय, तेव्हा सुपाऱ्या देण्याचं काम करताय आणि आमची सुपारी दिली असं आम्हाला त्यांच्या जिल्हा परिषद सदस्यांनी या ठिकाणी सांगितलं की बाबा जरा सांभाळून राहा या अतुल सर्वांनी तुमची सुपारी दिल्या. पुढच्या दोन-चार महिन्यात तुमचा कार्यक्रम केल्याशिवाय सोडत नाही.

आम्ही मरायला घाबरत नाही. आमच्या नांदाला लागले तर आम्ही नाद केल्याशिवाय सोडत नाही. ते सांगण्यासाठी आज या ठिकाणी आलेलो आहे आज अतुल चव्हाण यांची तात्काळ बदली करण्यात यावी सार्वजनिक बांधकाम मंत्री व मुख्यमंत्री यांना आपल्या माध्यमातून मंगेश साबळे माझी विनंती आहे की जर का प्रशासन आणि जर का सुशासन व्यवस्थित चालवायचे असेल लोकशाही व्यवस्थित चालवायची असेल तर पत्नी आम दार असताना पुतण्यांना जिल्हा परिषद सदस्य असताना भाऊ कारखान्याचा या ठिकाणी चेअरमन असताना त्याच अधिकाऱ्याला या तालुक्यामध्ये जिल्ह्यामध्ये पोस्टिंग देणे हे आपल्या नैतीकतेला शोभत नाही. फडणवीस साहेब आपण वारंवार म्हणतात मी इम ानदार आहे आणि इमानदार असताना अशा अधिकाऱ्याला महिलांच्या अडून या ठिकाणी राजकीय काम आपण करायला लावताय आणि सामान्य प्रश्नासाठी आवाज उचलणाऱ्या पोरांच्या सुपाऱ्या देण्याचं काम या ठिकाणी या तुमच्यावर करत आहे यांच्यावर कडक कारवाई होऊन यांनी केलेल्या पूर्ण भ्रष्टाचाराचे सन्माननीय अंबादास दानवेजी यांनी जो स्कॅनर घोटाळ्याचा उल्लेख केला होता त्याच्यामध्ये भ्र शब्दही आला नाही.

> “मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांना आणि अशा केंद्रीय मंत्र्यांना पैसे भरून योग्य त्या ठिकाणी हवी त्या ठिकाणी बदली
>
> 
>
> करू नये असे अधिकारी येतात आणि आठ दिवसांमध्ये आमची चेतावणी आहे जर का या अतुल चव्हाणची बदली झाली आहे सामान्य वर्ष अन्याय सामना इथली राजकीय दहशत संपवली नाही तर लोकशाही वर घातक म्हणून या ठिकाणी या विभागीय आयुक्त कार्यालयासमोर जी श्रीकांत सर यांच्या कार्यालयासमोर या ठिकाणी आम्ही बसून आणण्यात आंदोलन करणारा उपोषण करणार.
>
> **- मंगेश साबळे**

# शुक्लेश्वर मंदिर देवस्थानची जमीन हिंदू मिळकत; नियमबाह्य पद्धतीने इतर समाजाच्या व्यक्तींना विकली

## खुलताबाद निबंधक कार्यालयातील अशोक इंगोले यांचा प्रताप

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

फाजलपूरा येथील श्री शुक्लेश्वर मंदिर देवस्थानच्या जमिनीच्या कथित बेकायदेशीर दस्त नोंदणी प्रकरणाने पुन्हा एकदा नोंदणी विभाग चर्चेत आला आहे. खुलताबाद येथील सहाय्यक दुय्यम निबंधक अशोक इंगोले यांनी आपल्या शासकीय पदाचा दुरुपयोग करून नियमबाह्य पद्धतीने दस्त नोंदणी केल्याचा गंभीर आरोप करत शहर जिल्हाध्यक्ष सतिश जगन्नाथ नरवडे यांनी सह. जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विवेक गांगुर्डे यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली आहे.

खुलताबाद तालुक्यातील सहाय्यक दुय्यम निबंधक अशोक इंगोले यांनी आपल्या शासकीय पदाचा दुरुपयोग करून आपल्या आर्थिक स्वार्थापोटी शासनाचे सर्व नियम व अटी यांची पायमल्ली करून फाजलपूरा येथील शुक्लेश्वर मंदीराची जागा नियम बाहय दस्त नोंदणी केल्या आहे. त्यामध्ये दस्त क्र. ५११, ५१२,५१८, ५१४, ५५, ५१६, ५१७, ५१८, ५१९,५२० या क्रमांकाचे दस्त नोंदणी केले असून त्यामध्ये ५ दस्त नोंदणी हे भाडेपट्टयाचे रद्द पत्र असून ५ दस्तनोंदणी हे खरेदीखताचे आहे.




**भिमशक्ती शहर जिल्हाध्यक्ष सतिश जगन्नाथ नरवडे यांनी सह. जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विवेक गांगुर्डे यांना निवेदन सादर केले.**

> “ या प्रकरणाची चौकशी करून लवकरात लवकर निकाली काढू यात जो अधिकारी दोषी असेल त्याच्यावर कारवाई करू असे सह. जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी विवेक गांगुर्डे यांनी सांगितले.

फाजलपूरा येथील श्री. शुक्लेश्वर मंदीर देवस्थान सि.स.नं. ११४१२/२, ११४१२, ११४१२/११, तसेच ११४१२/१२ असे असून दिनांक १८/०२/२०२६ रोजी खुलताबाद कार्यालय येथे दस्त नोंदणी झाल्या असून यामध्ये लक्ष्मण भाले यांनी भाडेपट्टा करुन दिला नाही आणि यांना काहीच अधिकार नाही.

राधाबाईने हा भाडेपट्टा करुन दिला आहे. मुळात त्यांनीच भाडेपट्टा रद्द करायला पाहीजे होता. सूधाकर सामग यांना दत्तक पुत्र म्हणुन घोषीत केले होते. त्यांना गिफ्ट डीड दिले होते. परंतु न्यायालयाने ते फेटाळले. सदरील जागा ही शुक्लेश्वर मंदीर देवस्थान ट्रस्ट म्हणून धर्मादाय आयुक्त येथे नोंद आहे. मा. उच्च न्यायालय दावा क्र. ४२१/१९९३ मध्ये याबाबत चा सविस्तर तपशील व निर्देष आहे. त्यानंतर या मिळकती संदर्भातले जुने कागदपत्र असून झालेल्या दस्तनोंदणी मध्ये याबाबतची कुठलीही माहिती मिळत नसून सदरील जमीन हिंदु मिळकत श्री शुक्लेश्वर मंदीरची असून नियमबाह्य पद्धतीने मुस्लीम समाजाच्या व्यक्तींना विकली असून यामध्ये हिंदु समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहे. त्यामुळे समाजात एक चुकीचा मॅसेज पसरत आहे. सदरील दस्त नोंदणी करते वेळेस कुठल्याच प्रकारची कायदेशीर बाबी न तपासता बेकायदेशीर पणे हे करण्यात आले आहे. त्यामुळे परत एकदा रजिस्ट्री कार्यालय हे चर्चेचा विषय बनला आहे.

पान ३ वर...

# जि.प. अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध विकास कामांच्या मागण्यांचे निवेदन सादर



**राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची भेट घेऊन छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या विविध विकास कामांच्या मागण्यांचे निवेदन जिल्हा परिषद अध्यक्ष मा.श्री अविनाश गलांडे पाटील यांनी दिले तसेच सोबत भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजयजी खंबायते उपस्थित होते.**

# विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांची मृद व जलसंधारण विभागाच्या सचिव पदावर बदली

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांची मंत्रालय, मुंबई येथे मृद व जलसंधारण विभागाच्या सचिव पदावर बदली करण्यात आली आहे. ते नवीन पदाचा कार्यभार माणिक गुरसळ (भाप्रसे) यांच्याकडून स्वीकारणार आहेत.

या बदलीबाबतचे आदेश कालच शासनाकडून निर्गमित करण्यात आले आहेत. नुकतेच जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त पदाचा कार्यभार जी. श्रीकांत यांच्याकडे सोपविला होता.

# अल्पवयीन माता संख्येत वाढः एक सामाजिक समस्या

आजच्या काळात भारतासह अनेक विकसनशील देशांमध्ये अल्पवयीन मातांची संख्या वाढत असल्याचे स्पष्ट संकेत दिसून येतात. ही समस्या केवळ आरोग्यापुरती मर्यादित नसून सामाजिक रचना, शिक्षणव्यवस्था, आर्थिक विषमता आणि सांस्कृतिक परंपरा यांचा एकत्रित परिणाम आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे व्यापक सामाजिक समस्येच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.

अल्पवयीन माता म्हणजे ज्या मुलींना अठरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी मातृत्व प्राप्त झाले आहे. या वयात मुलींचा शारीरिक व मानसिक विकास पूर्ण झालेला नसतो. त्यामुळे गर्भधारणा आणि प्रसूतीदरम्यान गंभीर आरोग्यधोके निर्माण होतात. NFHS-5 (२०१९-२१) नुसार भारतात १५-१९ वयोगटातील सुमारे ६.८% मुली या आई झालेल्या किंवा गर्भवती आहेत. काही राज्यांमध्ये हे प्रमाण अधिक असल्याचेही दिसून येते.

या समस्येची कारणे बहुआयामी आहेत. ग्रामीण भागात अजूनही बालविवाह पूर्णपणे थांबलेला नाही. विविध अहवालांनुसार सुमारे २३% महिलांचे विवाह अठरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झालेले आहेत. विवाहानंतर लगेच मातृत्व स्वीकारण्याचा सामाजिक दबाव निर्माण होतो. त्याचबरोबर लैंगिक शिक्षणाचा अभाव, कुटुंबातील संवादाची कमतरता आणि आरोग्यविषयक अज्ञान यामुळे अनपेक्षित गर्भधारणा वाढते.

गरीबी आणि शिक्षणाचा अभाव ही या समस्येची मुळे आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलींचे शिक्षण लवकर थांबवले जाते आणि विवाह हा एक पर्याय म्हणून स्वीकारला जातो. संशोधनानुसार शिक्षण नसलेल्या मुलींमध्ये किशोरवयीन मातृत्वाचे प्रमाण सुमारे १८% पर्यंत, तर उच्च शिक्षित मुलींमध्ये ते सुमारे ४% पर्यंत मर्यादित असते. यावरून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते.

अल्पवयीन मातृत्वाचे परिणाम दूरगामी आहेत. आरोग्याच्या दृष्टीने किशोरवयीन गर्भधारणेमध्ये गुंतागुंत होण्याचा धोका प्रौढ महिलांच्या तुलनेत २ ते २.५ पट जास्त असतो. जागतिक स्तरावर १५-१९ वयोगटातील मुलींसाठी गर्भधारणा आणि प्रसूती हे मृत्यूचे एक प्रमुख कारण मानले जाते. भारतात एकूण मातामृत्यूंपैकी सुमारे १०% मृत्यू किशोरवयीन मातांचे असल्याचे अभ्यास दर्शवतात. सामाजिक आणि आर्थिक पातळीवरही याचे गंभीर परिणाम होतात. मुलींचे शिक्षण अर्धवट राहते, त्यामुळे त्यांचे करिअर घडण्याआधीच थांबते. परिणामी त्यांचे आर्थिक स्वावलंबन कमी होते आणि गरिबीचे चक्र कायम राहते. मानसिक ताण, नैराश्य आणि सामाजिक एकाकीपणाही वाढतो. अशा परिस्थितीत जन्मलेल्या बालकांनाही कुपोषण, आरोग्य समस्या आणि शिक्षणातील अडचणींचा सामना करावा लागतो.

जागतिक स्तरावरही ही समस्या चिंताजनक आहे. दरवर्षी सुमारे १.२ कोटी किशोरवयीन मुली मातृत्व स्वीकारतात, आणि जागतिक किशोरवयीन जन्मदर सुमारे ३९ जन्म प्रति १००० मुली इतका आहे. त्यामुळे ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या समस्येवर उपाय करण्यासाठी सर्वसमावेशक आणि समन्वित दृष्टिकोन आवश्यक आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी करणे, मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि त्यांना शाळेत टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शालेय स्तरावर सर्वसमावेशक लैंगिक शिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच आरोग्य केंद्रांमार्फत किशोरवयीन मुलींसाठी समुपदेशन आणि आरोग्य सेवा उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

समाजात जागरूकता निर्माण करणे ही या समस्येवर मात करण्याची सर्वात प्रभावी पायरी आहे. पालक, शिक्षक, समाजनेते आणि स्वयंसेवी संस्था यांनी एकत्र येऊन मुलींच्या हक्कांबाबत जागरूकता वाढवावी. मुलींना शिक्षण, स्वातंत्र्य आणि निर्णयक्षमता देणे हीच दीर्घकालीन उपाययोजना ठरू शकते.

अल्पवयीन मातांची वाढ ही समाजाच्या प्रगतीसाठी गंभीर अडथळा आहे. त्यामुळे ही समस्या केवळ चर्चेपुरती न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून सोडवणे आवश्यक आहे. योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी आणि सामाजिक संवेदनशीलता यांच्या मदतीनेच आपण अधिक सशक्त, समतोल आणि जागरूक समाज निर्माण करू शकतो.

**थोडक्यात प्रश्नोत्तरे:**

१. अल्पवयीन माता म्हणजे कोण?

ज्या मुलींना अठरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी मातृत्व प्राप्त झाले आहे, त्यांना अल्पवयीन माता म्हणतात.

२. भारतात किशोरवयीन मातृत्वाचे प्रमाण किती आहे?

छऋकड-५ नुसार सुमारे ६.८% मुली (१५-१९ वयोगटातील) आई झालेल्या किंवा गर्भवती आहेत.

३. बालविवाहाचे प्रमाण किती आहे?

सुमारे २३% महिलांचे विवाह अठरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वी झालेले आहेत.

४. या समस्येचे मुख्य कारण काय आहे?

बालविवाह, शिक्षणाचा अभाव, गरिबी आणि लैंगिक शिक्षणाची कमतरता ही प्रमुख कारणे आहेत.

५. अल्पवयीन मातृत्वाचे आरोग्यधोके कोणते?

रक्तक्षय, कुपोषण, प्रसूतीतील गुंतागुंत आणि मातामृत्यूचा धोका वाढतो.

६. या समस्येवर उपाय काय आहेत?

बालविवाह रोखणे, मुलींचे शिक्षण वाढवणे, लैंगिक शिक्षण देणे आणि जागरूकता निर्माण करणे.

**– डॉ. सुवर्णा कराड,**
प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ, महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही ग्रामपंचायत पद्धती!

**पंचायत राज व्यवस्था स्वीकारणारे महाराष्ट्र हे देशातील ९वे राज्य आहे. महाराष्ट्राने वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वात पंचायत राज व्यवस्था स्वीकारण्यासाठी समिती गठीत केली होती. त्यानंतर दि.१ मे १९६२ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तयार करण्यात आला. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर ज्ञानवर्धक लेख... संपादक.**

भारत देशात पंचायत राज व्यवस्था कार्यरत आहे. त्यामुळे देशातील अंतर्गत कारभार पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून चालवण्यात येतो. त्यासाठी ग्राम पंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ही सार्वभौम मानली जाते. या पंचायत राज व्यवस्थेतून ग्रामीण भागातील कारभार सुरू करण्यात येतो. त्यामुळे पंचायत राज व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय पंचायत राज दिन २४ एप्रिलला साजरा करण्यात येतो. काय आहे बरं, पंचायत राज दिनाचा इतिहास? लॉर्ड रिपन या इंग्रज अधिकाऱ्याला भारतीय पंचायत राज व्यवस्थेचा जनक मानले जाते. लॉर्ड रिपनने भारतात १२ मे १८८२ला स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्या आहेत. त्यानंतर भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेला पंचायत राज हे नाव दिले. त्यानंतर दि.२४ एप्रिल १९९३ला ७३वी घटना दुरुस्ती करुन पंचायत राज व्यवस्था अधिकृत करण्यात आली. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी राजस्थानातील नागौर जिल्ह्यातील बगदरी गावात दि.२ ऑक्टोबर १९५९ रोजी पहिल्यांदा पंचायत राज व्यवस्था सुरू केली. त्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी दि.२४ एप्रिल २०१०ला राष्ट्रीय पंचायत राज दिनाची घोषणा केली. तेव्हापासून भारतात २४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून साजरा करण्यात येतो. भारतात लॉर्ड रिपनने स्थानिक स्वराज्य संस्था सुरू केल्यानंतर ही व्यवस्था बळकट करण्यात आली. पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २४ एप्रिल हा दिन राष्ट्रीय पंचायत राज दिन म्हणून जाहीर केला. महाराष्ट्र पंचायत राज व्यवस्था स्विकारणारे ९वे राज्य आहे. पहिल्यांदा राजस्थानने पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. त्यानंतर आंध्रप्रदेशाने १ नोव्हेंबर १९५९ला पंचायत राज व्यवस्था स्विकारली आहे. तर महाराष्ट्राने पंचायत राज व्यवस्था लागू करण्यासाठी वसंतराव नाईक समिती १९६०ला नेमली होती. या समितीने आपला अहवाल १५ मार्च १९६१ला शासनाला सादर केला होता. दि.१ एप्रिल १९६१ला सरकारने हा अहवाल स्विकारला होता. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नव्हती. त्यानंतर दि.१ मे १९६२ला सरकारने महाराष्ट्र राज्यात पंचायत राज व्यवस्था लागू केली. त्यानुसार वसंतराव नाईक समितीच्या शिफारसीवरुन महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ तयार करण्यात आला.

पंचायत राज व्यवस्थेच्या मुळाचा शोध घ्यावयाचा झाल्यास भारतात अगदी प्राचीन काळापासून पंचायती अस्तित्वात असल्याचे दिसते. अर्थात आजच्या पंचायत राज पद्धतीपेक्षा त्याचे स्वरूप खूपच वेगळे होते. गावातील हुशार, अनुभवी, आदरणीय अशी पंचमंडळी असायची. गावातील चावडी सारख्या सार्वजनिक ठिकाणी रोज सकाळी ही मंडळी बसायची आणि गावातील लोकांच्या अडचणी समजावून घेऊन मार्गदर्शन करावयाची. गावामध्ये काही वाद, भांडणे झाल्यास त्यामध्ये लक्ष घालून सोडविणे, गावचा विकास होण्यासाठी योजना आखणे, गावाचा कारभार चालविणे, गावाचा कर गोळा करून राजाला खंड वसूली देणे इ.कामे ही पंचमंडळी पार पाडीत असत. गावात त्यांना फार मान होता. गावकरी त्यांच्या शब्दाबाहेर जात नसत.



– संकलन व सुलेखन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

मौर्यांच्या काळामध्ये तर त्यांना ग्रामशासनाचा अधिकार होता. व त्या दृष्टीने या पंचायती खूपच विकसित झालेल्या होत्या. सन ८०० ते १०००च्या दरम्यान बोल घराण्याच्या इतिहासातील एकल येथील चौदा शिळा खऱ्या ग्रामपंचायतीच्या निर्देशक आहेत. आजच्या ग्रामपंचायती करीत असलेली विविध गाव विकासाची कामे या ग्रामपंचायती त्या वेळी करीत होत्या. ग्रामपंचायतीची निवडणूक दरसाल होत असे व सर्व सभासद लोकनियुक्त असत. त्यांच्यावर सरकारी अधिकाऱ्यांची देखरेखीसाठी नेमणूक होई. ग्रामपंचायतीकडे स्वतःच्या निधी असायचा. न्यायनिवाडे ही पंचायत करी, फाशीची शिक्षा क्वचितच अंमलात येई. देवळात नंदादीप लावणे अगर पंचायतीस अमुक इतक्या गाई पुरविणे या गोष्टी शिक्षा म्हणून देत असत.

भारतात अनेक साम्राज्ये आली होती. बाहेरून आलेल्या मोगलांनी ही पद्धत स्विकारली. भारतासारख्या खंडप्राय खेड्यापाड्यात विखुरलेल्या देशाला विकेंद्रित शासनाचीच जरुरी होती. त्यामुळेच ही पद्धत अनेक वर्षे टिकून होती. त्यातूनच खेडी स्वयंपूर्ण बनत होती. ग्रामीण कारागीर, कष्टकरी यांना पोट भरण्याकरीता व्यवसाय मिळत होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात ग्रामपंचायतीची पद्धत चोहीकडे चालू होती. तीच रयतेच्या सोयीची वाटल्यावरून महाराजांनी कायम ठेवली. रयतेला न्याय मिळवण्यासाठी लांब कुठे जावे लागू नये, म्हणून गावातील पंचांनीच फुकट न्याय द्यावा, हे अभिप्रेत होते. छत्रपतीच्या काळात ग्राम पंचायती पूर्वीप्रमाणे चालू होत्या. ब्रिटीशांच्या आगमनानंतर त्यांनी मात्र आपापल्या स्वार्थासाठी गावगड्यांची चालू व्यवस्था मोडीत काढून तलाठी पोलीस पाटील यांच्यापासून ते कलेक्टर पर्यंत नोकरशाहीची फौज निर्माण केली. सन १८८२ साली लॉर्ड रिपनने मर्यादित स्वरुपात स्थानिक स्वराज संस्थेचा कार्यक्रम अंमलात आणला. परंतु आरोग्य आणि प्राथमिक सोयी सुविधा पुरतेच त्यांचे उद्दिष्ट मर्यादित होते. त्यामध्ये स्वराज्याचा मागमूसही नव्हता. याच काळात तालुका लोकल बोर्ड, जिल्हा लोकल बोर्ड व काही मोठया गावात ग्रामपंचायती स्थापन झाल्या. या स्थानिक स्वराज्य संस्था स्वातंत्र्य प्राप्ती नंतरही काही काळ चालू होत्या.

देशाच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात देशाच्या पुनरुत्थापनाचा व नवनिर्माणाचा विचार सुरू झाला. त्यामध्ये गाव विकासाच्या दृष्टीने विचार होणे स्वाभाविक होते. महात्मा गांधीनी स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात खेड्याकडे जाण्याचा मार्ग दाखविला आणि ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली होती. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना नवा मुलभूत आणि व्यापक अर्थ मिळाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि घटना समितीची स्थापना झाली. स्वातंत्र्य लढ्यात लोकांनी उराशी बाळगलेल्या ध्येयात ग्राम स्वराज्य हे सूत्र होते. त्यामुळे देशाची घटना होत असताना ग्रामपंचायतीचा स्वतंत्र तिसरा सत्र असावा अशी सूचना मांडण्यात आली. त्या सूचनेला घटना समितीतील काही लोकांनी विरोध केला. भारतीय समाज व्यवस्था जाती व्यवस्थेच्या उतरंडीवरच आधारीत असल्यामुळे तथाकथित उच्च वर्गीय जातींना पंचायत व्यवस्थेत पंच म्हणून स्थान मिळत असे. तसेच गांवातील उच्च जातीय लोकच निर्णय घेण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असत. अशा रितीने या पूर्ण व्यवस्थेमध्ये स्त्रिया आणि तथा कथित खालच्या जातींना कोणतेही स्थान नव्हते. ही व्यवस्था समानतेवर आधारीत नाही असे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांचा या व्यवस्थेला विरोध होता. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या तिसऱ्या स्थराची व्यवस्था अंमलात येण्यासाठी काही काळ थांबावे लागेल, कारण ग्रामपंचायतीचा वापर समाजातील हित संबंधी व श्रीमंत लोक करून घेतील व सर्व सामान्य लोकांवर व दलीतांवर अन्याय होईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली. तरीसुद्धा घटना समितीने सामाजिक उद्दिष्ट म्हणून 'राज्ये, ग्रामपंचायत संघटीत करतील व त्यांना स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून काम करण्यास आवश्यक अधिकार देतील' असे चाळीसाव्या मार्गदर्शक सूत्रात नमूद केले. बलवंतराय मेहता अभ्यास गटाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिली पंचवार्षिक योजना अमलांत आणली. शेतकऱ्यांचा आणि खेड्यांतील इतर लोकांचा विकास करून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. लोकांचा सहभाग यामध्ये अपेक्षित होता पण या योजनेला म्हणावा तसा लोकसहभाग मिळाला नाही. या कामाची पाहणी करण्यासाठी नियोजन मंडळाने बलवंतराय मेहतांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यासगट नेमला. या अभ्यास गटाने आपला अहवाल सन १९५७ साली सदर केला. त्यामध्ये पंचायत राज्याची संकल्पना दिशा आणि रचनेच्या दूरगामी व अमुलाग्र बदलासाठी शिफारशी करण्यात आल्या आणि प्रथमच लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज्याची संकल्पना मांडण्यात आली. राजस्थान सरकारने बलवंतराय समितीच्या सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीची योजना आखली. दि.२ ऑक्टोबर १९५९ रोजी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते या योजनेचे उद्घाटन केले आणि देशांत पंचायत राज सुरु झाले, अशी घोषणा केली. त्यानंतर ही व्यवस्था पंचायत राज या नावाने लोकप्रिय झाली. पंचायत राज व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या समित्या वेळोवेळी स्थापन करण्यात आल्या. त्यात श्री.व्ही.टी.कृष्णम्माचारी यांच्या अध्यक्षतेखाली १९६० साली समिती नेमण्यात आली. या अभ्यासगटाने काही महत्वाच्या शिफारसी केल्या. कायद्याने ग्राम सभा प्रस्थापित कराव्या व त्यांच्या किमान दोन सभा व्हाव्यात ही महत्वाची शिफारस या अभ्यास गटाने केली. सन १९७७ साली अशोक मेहता समिती स्थापन करण्यात आली. प्रत्येक राज्यातील पंचायत राज व्यवस्था त्या त्या राज्याच्या परिस्थितीप्रमाणे वेगवेगळी असू शकेल. आवश्यक वाटल्यास घटनेत दुरुस्ती करून पंचायत राज व्दारे लोकशाही विकेंद्रिकरण झाले पाहिजे असे मत या समितीने मांडले. सन १९८५ साली नियोजन मंडळाने ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम परिणामकारक रितीने राबविला जावा म्हणून श्री.जी.व्ही.के. राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीनेही लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असावा म्हणून पंचायत राज व्यवस्थेला महात्वाचे स्थान असावे, अशी शिफारस केली.

महाराष्ट्र शासनानेही पंचायत राज व्यवस्थेच्या यशस्वी परिणामकारकतेसाठी वेळोवेळी अभ्यासगट व समित्यांची स्थापना केली. एस.जी.बर्वे समिती १९६८, बोगिरवार समिती १९७०, मंत्रिमंडळाची उपसमिती १९८०, आणि पंचायत राज व्यवस्थेचे मुल्यमापन करण्यासाठी १९८४ साली प्राचार्य पी.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. या समितीने आपला अहवाल १९८६ साली सादर केला. ही सर्वात अलिकडील समिती असून त्यांच्या शिफारशीच्या आधारे राज्यशासन वेळोवेळी विचार करून दुरुस्त्या करीत आहे.

**एल.एम.सिंघवी समिती** – सन १९८४च्या अखेरीस राजीव गांधी यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्रे स्विकारली. त्यांच्या सरकारने पंचायत राज्य संस्थेला मजबूती प्रदान करण्याच्या उद्देशाने सन १९८६च्या जून महिन्यात एल.एम.सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली ङ्गलोकशाही आणि विकास कामी पंचायतीचे पुर्नजीवन करण्यासाठी समितीङ्ग नियुक्त केली. पंचायत राज संस्थांची सध्याची स्थिती त्यांची आत्तापर्यंतची वाटचाल आणि विकास कार्यातील त्यांची भूमिका इत्यादीचे मूल्यमापन करण्याची तसेच ग्रामीण विकास व राष्ट्रबांधणीच्या कार्यात पंचायत राज्य संस्थांना भरीव योगदान कसे करता येईल याबाबत उपाय सुचविण्याची जबाबदारी सिंघवी समितीवर सोपविण्यात आली होती. एल.एम.सिंघवी समितीच्या बऱ्याचशा शिफारशी यापुर्वीच्या काही समित्यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणेच आहेत. तथापि सिंघवी समितीने एक अत्यंत महत्त्वपूर्ण शिफारस केली ती म्हणजे ङ्गपंचायत राज संस्थांना किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक मान्यता व संरक्षण देण्यात यावे. त्याकरीता भारतीय राज्य घटनेत एक नवे प्रकरण समाविष्ट करण्यात यावे.ङ्ग सिंघवी समितीची ही शिफारस अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानावी लागेल. भारतात पंचायत राज्याची स्थापना झाल्यानंतर राजकिय नेत्यांनी व राज्यकर्त्यांनी ग्रामीण पुर्नरचनेच्या तसेच ग्रामीण विकासाच्या कार्यात पंचायत राज संस्था महत्त्वाची भूमिका बजावतील म्हणून त्यांना सक्षम बनविण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत, अशा अर्थाचे मत प्रदर्शन केले. ७३वी घटना दुरुस्ती करण्यामागे सिंघवी समितीच्या अहवालाचे फार मोठे योगदान आहे, असे म्हटल्यास त्यात वावगे काहीच नाही! !! पंचायत राज दिनानिमित्त सर्व भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

– संकलन व सुलेखन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी,**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# प्लास्टिकविरोधी मनपाची धडक कारवाई 11,000 किलो प्लास्टिक जप्त; सुमारे 40 लाख पिशव्या वापरातून रोखल्या

● काही विक्रेत्यांनी स्वतःहून प्रतिबंधित प्लास्टिक जमा केले
● शहर प्लास्टिकमुक्त करण्यासाठी मोहिमेला गती
● मनपाचा इशारा: नियम भंगावर कठोर कारवाई सुरूच

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेची सलग तिसऱ्या दिवशी प्लास्टिक विरोधात धडक कारवाई, विविध छोट्या मोठ्या प्लास्टिक व्यावसायिकांच्या दुकानांवर गोडाऊनवर धडक कारवाई मध्ये १००० किलो पेक्षा जास्त प्लास्टिक जप्त करून शहरात झालेल्या अनेक कारवाई मध्ये ३७००० हजार रुपये केला दंड. गेल्या तीन दिवसा पासून चालू असलेल्या ह्या कारवाई मध्ये आतापर्यंत ११००० किलो पेक्षा जास्त प्लास्टिक केले जप्त आहे. ज्यात जवळपास ४० लाख पिशव्या तसेच अनेक वस्तू वापरात येण्यापासून रोखण्यात मनपाला यश आले आहे.

सततच्या छापेमारीमुळे नियमभंग करणाऱ्यांमध्ये खळबळ छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहराला प्लास्टिकमुक्त करण्यासाठी राबविण्यात येणारी कठोर व सातत्यपूर्ण मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून, आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी पुन्हा एकदा बेकायदेशीर प्लास्टिक साठा करणाऱ्या विक्रेत्यांवर निर्णायक कारवाई करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने आज शहरातील मध्यवर्ती भागात सलग तिसऱ्या दिवशी नागरी मित्र पथकाद्वारे प्लास्टिक विक्रेत्यांवर धडक कारवाई करून मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले.

गेल्या दोन तीन दिवसापासून चालू असलेल्या ह्या कारवाई मध्ये जवळपास ११००० किलो पेक्षा जास्त एकल प्लास्टिक महानगरपालिकेने जप्त करून त्याची विल्हेवाट लावली आहे, जेणेकरून ते प्लास्टिक परत वापरात येऊ नये.

या कारवाईच्या धास्तीने शहरातील



काही प्लास्टिक विक्रेत्यांनी स्वतः हून प्रतिबंधित प्लास्टिक घनकचरा व्यवस्थापन विभाग छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका येथे जमा केले आहे.

मोठ्या कारवायांचा धडाका कायम राहणार असून गेल्या काही दिवसांत महानगरपालिकेकडून शहरातील विविध भागांत अचानक छापेमारी करून हजारो किलो प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला आहे. या सातत्यपूर्ण कारवायांमुळे नियमभंग करणाऱ्या छोट्या मोठ्या सर्व व्यवसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, मनपाने आपली भूमिका अधिकच आक्रमक केली आहे.

मनपा प्रशासनाचा स्पष्ट इशारा दिला आहे की प्लास्टिक साठा, विक्री किंवा वापर याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. नियमभंग आढळल्यास अचानक छापेमारी करून दंडात्मक कारवाई केली जाईल. आवश्यकतेनुसार साठा जप्ती, दंड आणि पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल. महानगरपालिका उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख नंदकिशोर भोंबे यांनी सांगितले की यानंतर सुद्धा शहरात प्रतिबंधित प्लास्टिक विक्रेते विरोधात नियमितपणे कारवाई करणे चालू राहणार तसेच नागरिकांमध्ये प्रतिबंधित प्लास्टिकचा वापरबंद करण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे तसेच प्लास्टिक विक्रेत्या व्यावसायिकांना नागरिकांसाठी पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत महानगरपालिका मदत करणार आहे तसेच जनजागृती करण्यात येणार आहे. शहरात प्रतिबंधित प्लास्टिकची वाहतूक व विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याने मनपा आयुक्त श्री. अमोल येडगे सर यांच्या आदेशानुसार व उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख श्री. नंदकिशोर भोंबे मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त रमेश मोरे, नागरी मित्र पथक कर्मचारी देविदास सुसर, बालाजी साबळे, सुवर्णसिंग परदेशी, जनार्दन सांगळे, यांच्या पथकाने ही धडक कारवाई केली. यावेळी या पथकाच्या सोबतीला घनकचरा व्यवस्थापन विभागाचे स्वच्छता अधिकारी अनिल जाधव, स्वच्छता निरीक्षक सचिन मिसाळ,वंदना पवार, रीमा मलके, तसेच स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन



भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करून त्यांच्या पवित्र स्मृतींना किशोर आबा पवार यांनी विनम्र अभिवादन केले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय ही मूल्ये आपल्या समाजाच्या प्रगतीचा खरा पाया आहेत, यावर किशोर आबा पवार यांनी मनोगत व्यक्त केले.

## महाराष्ट्र राज्य विज तांत्रिक कामगार संघटनेचे २८ वे महाअधिवेशन पोस्टरचे अनावरण



**परभणी :** महाराष्ट्र राज्य विज तांत्रिक कामगार संघटनेचे २८ वे महाअधिवेशन तथा ध्वजारोहण १५ मे नाशिक येथे परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा उर्जा राज्यमंत्री मा. ना.श्रीमती मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते होणार. दि.२३ एप्रिल रोजी परभणी येथील उर्जा राज्यमंत्री यांच्या निवासस्थानी महाअधिवेशन पोस्टर चे अनावरण श्रीमती मेघनादीदी यांच्या हस्ते संपन्न. थोडक्यात महाराष्ट्र राज्य विज तांत्रिक कामगार संघटनेचे शिष्टमंडळ केंद्रीय उपाध्यक्ष नाना साहेब चट्टे यांच्या अध्यक्षतेखाली उर्जा राज्यमंत्री ना. श्रीमती मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली १५ मे २०२६ ला होवू घातलेल्या संघटनेच्या २८ व्या महाअधिवेशनाचे पोस्टर चे विमोचन मा.ना.मेघनादीदी यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

पान १ वरून...

## शुक्लेश्वर मंदिर देवस्थानची जमीन हिंदू मिळकत....

सदरील मिळकत ही छत्रपती संभाजीनगर शहरातील फाजीलपूरा येथील असून त्यामध्ये लिहुन देणार व लिहुन घेणार हे सुद्धा शहरातीलच आहे. परंतु त्यामध्ये खुप मोठ्या प्रमाणात नियमबाह्य बाबी असल्यामुळे शहराच्या बाहेर म्हणजेच खुलताबाद येथील कार्यालयात करण्यात आले आहे.

तरी या संदर्भात असलेले सर्व जूने दस्तावेज देखील तक्रारदाराने अर्जासोबत जोडले आहेत. यामध्ये किती मोठ्या

प्रमाणात तफावत झाली आहे. यामाध्यमातून ते दिसून येते. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात सखोल चौकशी करुन झालेल्या बेकायदेशीर दस्त नोंदणी प्रकरणी सहाय्यक दुय्यम निबंधक खुलताबाद अशोक इंगोले यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करून संबंधितांकडून याबाबतचा लेखी खुलासा सादर करण्यात यावा व त्यामध्ये हे नियमबाह्य असल्यास त्यांच्यावरही फौजदारी स्वरुपाचे खटले दाखल करण्यात यावा तसेच यासंबंधी आणखी पूरावे आमच्याकडे असून चौकशी कामे ते आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल हि नम्र विनंती. सदरील अर्जावर १५ ते २० दिवसामध्ये कार्यवाही करण्यात यावी अन्यथा संघटनेच्या वतीने पुढील लोकशाही पद्धतीने तीव्र स्वरुपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल. या प्रकरणात काही अनुचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, कृपया नोंद घ्यावी.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंतीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन भीम उत्सव केला साजरा

## भारतीय दलित पँथरचा उपक्रम; वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल येरमे यांची उपस्थिती

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर सिडको एन.७ छत्रपती संभाजी नगर येथील संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे माध्यमिक विद्यालय क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भारतीय दलित पँथर जयंती उत्सव समितीच्या वतीने ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून भीम उत्सव साजरा करण्यात आला.

सर्वप्रथम शाळेच्या हॉलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अतुल येरमे व मा.लक्ष्मण दादा भुतकर आणि प्रा. प्रकाश सोनवणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व महामानवांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय दलित पँथरचे प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सिडको पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा. अतुलजी येरमे व ज्ञान संदिप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे उत्सव समितीचे अध्यक्ष मा.धम्मपाल दांडगे अडवोकेट सतीश राऊत संजयजी सरोदे पार्वताबाई घोरपडे बोर्डे किसनजी भिवसने सुगंध कांबळे उत्तमजी डोंगरे



रामदास पगडे यांची उपस्थिती होती.

या जयंती उत्सव सोहळ्यानिमित्त विशेष अतिथी म्हणून लाभलेले पी.आय.मा.अतुलजी येरमे यांचे भारतीय दलित पँथर चे नेते लक्ष्मण दादा भुतकर यांनी शाल पुष्पहार देऊन सत्कार केला तर ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रकाश सोनवणे यांनी सुद्धा संस्थेच्या वतीने शाल पुष्पहार देऊन सन्मानाने गौरव केला त्याचबरोबर भारतीय दलित पँथरच्या वतीने इयत्ता पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करतांना या शाळेतील विद्यार्थी शिक्षण घेऊन क्लास वन अधिकारी कलेक्टर कमिशनर असे अधिकारी बनाव व शाळेचे स्वतःचे आणि आई-वडिलांचे व शिक्षकाचे नाव उज्वल करावे अशा शुभेच्छा मान्यवरांनी आपल्या मनोगतातून दिल्या .

त्यानंतर नेते लक्ष्मण दादा भुतकर यांनी दिले यावेळी पोलीस निरीक्षक आदरणीय अतुल येरमे साहेब यांनी सांगितले की गोरगरिबांच्या मुलांना ही शाळा शिक्षणाच्या प्रवाहात आणत आहे. खरोखरच हि बाब कौतुकास्पद आहे व पँथर सारखे सामाजिक जाणीव असलेले कार्यकर्ते या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कार्यात मदत करत आहे त्यांचे सुद्धा भरभरून कौतुक आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन तुकाराम सोनवणे हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री संदीप सोनवणे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री.हर्षल पगारे यांनी केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याबद्दल त्यांच्या चेहऱ्यावर आनंद खुलून दिसत होता. जयंती नाचून नाही तर वाचून साजरी करावी हा आदर्श भारतीय दलित पँथर जयंती उत्सव समितीने दाखवून दिला

# मराठा आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी रमेश मुळे; संघटन विस्ताराला चालना

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या मराठा आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी रमेश अण्णा मुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी ही नियुक्ती जाहीर केली असून, यामुळे पक्ष संघटन विस्ताराला चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे.

२३ ऑगस्ट २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या नियुक्तीपत्रानुसार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्याची दखल घेत मुळे यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील त्यांचा व्यापक जनसंपर्क, कार्यकर्त्यांमधील प्रभाव व सक्रियता लक्षात घेता त्यांच्या निवडीकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.

पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आलेल्या अपेक्षेनुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेनुसार म राठा आघाडी अधिक सक्षम व बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे. ग्रामीण व शहरी भागात पक्षाची ताकद वाढविणे, नव्या कार्यकर्त्यांना जोडणे, संघटनात्मक बांधणी मजबूत करणे आणि समाजातील विविध घटकांशी संवाद वाढविणे, या बाबींवर मुळे लक्ष केंद्रित करणार असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली.

नियुक्तीनंतर बोलताना मुळे म्हणाले, ङ्गपक्षाने माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरविण्यासाठी प्रयत्नशील राहीन. मराठा आघाडी मजबूत करताना युवकांना मोठ्या प्रमाणात जोडण्यावर भर देणार असून समाजाच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेऊन पक्ष अधिक बळकट करण्यासाठी काम करणार आहे.

दरम्यान, मराठवाड्यातील विविध कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून या नियुक्तीचे स्वागत करण्यात आले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे पक्षाला नवी उभारी मिळेल आणि संघटनाला गती येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आगामी काळात मराठा आघाडीच्या म ाध्यमातून विविध उपक्रम राबविण्याची तयारी सुरू असल्याची माहितीही समोर येत आहे. राज्यातील आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात असून, संघटनात्मक पातळीवर पक्षाला याचा फायदा होईल आणि जनाधार वाढण्यास मदत मिळेल, असे जाणकारांचे मत आहे.

# पिण्याच्या पाण्यात संडासाचे पाणी, नागरिकांचे आरोग्य धोक्यात; मनपाचे दुर्लक्ष - पँथर नेते लक्ष्मण दादा भुतकर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



डॉ. आंबेडकर नगर एन-७ सिडको ही वसाहत पन्नास वर्षापासून जळगाव रोड पूर्व बाजूस वसली आहे. महानगरपालिका या वसाहतीला सुविधा पुरविते, टॅक्स घेते परंतु ४० वर्षांपूर्वीची ड्रेनेज लाईन जुनी झाली आहे ती बदलत नाही त्यामुळे ड्रेनेजचे पाणी पिण्याच्या पाण्यात निचरत असून सर्व नागरिक आजारी पडत आहेत याकडे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून ४० वर्ष पूर्वीची जुनी ड्रेनेज लाईन बदलून नवीन टाकून द्यावी व ड्रेनेज मेन होल भरले आहेत ते बार-बार भरत आहेत ती समस्या एकदा तात्काळ दुरुस्त करावी जेणेकरून आठ दिवसाला येणारे पिण्याचे पाणी थोडेफार चांगले येईल अशी मागणी भारतीय दलित पँथर व नागरिकांच्या वतीने मनपाकडे करत आहोत.


अनेक वेळा ड्रेनेची पाईपलाईन बदलण्यात यावी नागरिकांना आठ दिवसाला येणारे पिण्याचे पाणी सु स्वच्छ यावे कोणीही बिमार पडणार नाही याची काळजी घ्यावी व पँथरला आंदोलन करण्याची वेळ येणार नाही याची दक्षता अधिकाऱ्यांनी घ्यावी. पँथर नेते लक्ष्मण दादा भुतकर, धम्मापाल दांडगे, सिद्धार्थ बोर्ड, दशरथ कांबळे, पार्वती घोरपडे, कलावती गवई व डॉ.आंबेडकर नगर वसाहतीतील नागरिक यांनी महानगरपालिकेने याकडे लक्ष देवून स्वच्छ पाणी द्यावी अशी मागणी केली आहे.

# घाटी प्रशासनातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराबाबत गळयात मडकं पाठीला झाडू बांधून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करणार

## प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांच्या वतीने निवेदन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील सर्व चतुर्थश्रेणी कर्मचारी यांच्यावर होत असलेल्या अन्याय-अत्याचारासंदर्भात आपल्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार व निवेदने देण्यात आली आहे. तरी देखील आपण या सम स्यांकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा रोष वाढत असून प्रभारी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे हे आपले मनमानी व कर्मचाऱ्यावर बदलीचे संकट तसेच त्यांना निलंबनाची धमकी देत आहे.



यासाठी जिल्हाधिकारी साहेबांना कर्मचाऱ्यांच्या वतीने निवेदनाव्दारे विनंती करण्यात आली की, आपण मध्यस्थी करून या प्रकरण लक्ष देऊन प्रभारी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि वर्ग-४ कर्मचाऱ्यांची मिटिंग लावून चतुर्थ श्रेणी कर्मचारी त्यांचे जे प्रलंबित प्रश्न आहेत त्यांना आपण निकाली काढावे अन्यथा लोकशाही पद्धतीने आपल्या कार्यालयासम ोर येणाऱ्या दि.०५/०५/२०२६ रोजी गळ्यात मडकं आणि पाठीला झाडू असे अनोखे निदर्शन आपल्या कार्यालयासम ोर करण्यात येणार असल्याचे एका निवेदनाव्दारे प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात दिले आहे.

प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. बच्चुभाऊ कडू हे देखील या निदर्शनेसाठी उपस्थित राहणार आहेत. या माध्यमातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहिल. अशी माहिती राजेंद्र पोहाल यांनी दिली.

आमच्या मागण्या पुढील संस्थेत आगळ्या-वेगळ्या पद्धतीने सर्व अधिकाऱ्यांना आणि आपल्याला वेळोवेळी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. तरी देखील याची काहीही दखल घेण्यात येत नाही आणि कर्मचाऱ्यांचा प्रश्न सोडवण्यात दीरंगाई करत आहे. तसेच प्रभारी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी लाड पागे समितीचे जे १७० उमेदवार राखीव आहे यांच्यापन यादीमध्ये घोळ करण्यात आला आहे. ज्यामुळे लाड पागे समितीचे जे उम ेदवार ज्यांचे नाव मागच्या वर्षी ६ नंबर ला होते आजच्या यादीमध्ये त्यांचे नाव ४० व्या नंबरवर आहे. याची पण मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी सखोल चौकशी करावी आणि ज्याप्रमाणे महानगरपालिकेचे आयुक्त जी. श्रीकांत साहेब यांनी मागच्या वर्षी लाड पागेचे १२४ उमेदवार यांना पालकमंत्र्याच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले होते. आणि याच महिन्यात महानगरपालिकेचे नवनियुक्त महापौर श्री. समीर राजुरकर यांनी लाड पागेचे ५० उमेदवार यांना नियुक्ती पत्र वाटण्यात आले त्याच पद्धतीने आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील जे लाड पागेचे १७० उमेदवार आहेत त्यांना पण एकाच वेळेस नियुक्ती पत्र देऊन त्यांना न्याय देण्याचे काम आपण करावे हे सर्व कर्मचाऱ्यांच्या व त्याच्या परिवारांच्या वतीने आपल्याला विनंती करण्यात येत आहे.

घाटी प्रशासनापेक्षा म.न.पा. प्रशासन लाड पागे समिती अंमलबजावणी करण्यामध्ये पुढे आहे. घाटी प्रशासन मात्र तोंड पाहून काम करत आहे. सरळसेवा भरतीमध्ये नवीन उमेदवार ३५७ पैकी आजच्या घडीला १८७ उमेदवार कामावर हजर झालेले आहेत. १७० उमेदवारांची प्रभारी मा. अधिष्ठाता साहेबांनी लवकरात लवकर या उमेदवारांना रूजू करून घ्यावे. जेणेकरून रूग्णांची गैरसोय होऊ नये आणि जे १८७ उमेदवार कामावर रूजू झालेले आहेत यांना जुने वर्ग ४ कर्मचाऱ्याप्रमाणे रूग्णासंबंधित असलेले सर्व काम जसे की, स्वच्छता गृह, साफसफाई, तसेच धोबीचे कपडे आणणे आणि कॉल नोट करणे, इंडियन आणणे हे सर्व कामे या नवीन उमेदवारांना करणे गरजेचे आहे. असे मा. प्रभारी अधिष्ठाता यांनी सर्व उमेदवारांना पत्रात उल्लेख करून देणे. तसेच नवीन जमादार जे भरण्यात आलेले आहेत त्यांना कामावर रूजू होऊन किती वर्ष झाले आहेत आणि त्यांना कोणत्या शासन निर्णयाप्रमाणे त्यांना जमादार बनवण्यात आले आहे. यांची चौकशी करून नवीन जमादारांना तात्काळ हटवून त्यांना प्रत्येक वार्डात किंवा बाहेर परिसर अन्यथा ओटी डिपार्टमेंटला टाकने. शासन निर्णय प्रमाणे आपल्या संस्थेत जर का जमादार हे पद भरायचे असेल तर कर्मचाऱ्यांची सेवा किती वर्षाची झाली आहे त्याआधारे त्याला जमादार हे पद देण्यात येते. याची पण मा. जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी चौकशी करावी. त्याचप्रमाणे मा. प्रभारी अधिष्ठाता हे ज्याप्रमाणे सर्जरी बिल्डिंग जीर्ण झाली आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागांकडून यांना सर्जरी बिल्डिंगची ऑडिट करायला लावली आणि सर्जरी बिल्डिंग ही जीर्ण झाली आहे आणि त्या सर्जरी बिल्डिंग मध्ये ठिक ठिकाणी ४० ते ५० कोटीचे रिपेरिंगचे कामे चालू आहेत.

मागच्या ३ वर्षापासून कर्मचारी निवास्थानात फुटलेल्या ड्रेनेज लाईन, भितीला कलर, झाडे झुडपे वाढलेली आहे. त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानात मागच्या ३ वर्षापासून कोणतेही सार्वजनिक बांधकामाकडून कामे करण्यात आलेली नाहीत. पण मागच्या ३ वर्षापासून चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवास्थान कोणतेही मॅन्टेनेस करण्यात आले नाही याची मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी स्वतः सहानिशा करून चौकशी करावी व चतुर्थ श्रेणीत कर्मचारी निवास्थानात राहणारे कर्मचाऱ्यांच्या परिवाराला न्याय देण्याचे काम करावे ही विनंती प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांनी केली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र सुरक्षा बलचे एस.एस.ओ. सुरेश भाले हे चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना आणि तसेच महिला कर्मचाऱ्यांना उद्धट बोलणे, अरेरावेची भाषा वापरणे आणि माझी तक्रार तुम्ही कोणत्याही अधिकाऱ्यांक्रडे किंवा मंत्र्यांकडे करा माझ काही कोणीही वाकड करू शकत नाही. माझे मोठ मोठ्या अधिकारी व मंत्र्यापर्यंत हात आहेत. जर तुम्ही माझ्या विरोधात कुठेही तक्रार केली तर मी प्रभारी अधिष्ठा डॉ. शिवाजी सुक्रे यांना लावून सांगून तुमचे बदली किंवा तुमचे निलंबण करायला लावतो. तरी मा. जिल्हाधिकारी साहेबांना विनंती करण्यात येते की, यांची पण चौकशी करावी आणि त्या ठिकाणी नवीन अधिकारी नेमण्यात यावे ही विनंती. तरी मा. जिल्हाधिकारी साहेबांना सर्व शासकीय वैद्यकीय म हाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याच्या वतीने वारंवार पत्र व्यवहार तसेच आंदोलन आणि उपोषण करण्यात आले आहे. तरी देखील चतुर्थ श्रेणीत कर्मचाऱ्यांना न्याय भेटत नाही. लक्ष देऊन कर्मचाऱ्यांच्या मागण्याला न्याय द्यावा, अशी विनंती प्रहार जनशक्ती पक्ष कर्मचारी संघटनेचे शहराध्यक्ष राजेंद्र पोहाल यांनी केली आहे.

### - प्रमुख मागण्या -

१. सरळसेवा भरतीमध्ये ने ३५७ नवीन पद भरण्यात आले आहे त्या सर्व कर्मचाऱ्यांनी देखील जुने वर्ग-४ चे कर्मचा-याप्रमाणेच सर्व कामे करावी.
२. लाडपागे समितीचे रखडलेले कामे १६५ उमेदवार यांना आपल्या संस्थेत लवकरात लवकर भरती करण्यात यावे,
३. नवीन जमादार काढून जुने कर्मचाऱ्यांच्या सेवा पाहून त्यांना पदोन्नतीने जमादार पद देण्यात यावे.
४. चतुर्थश्रेणी कर्मचारी निवासस्थानाचे रखडलेले कलर काम, ड्रेनेज लाईन काम लवकरात लवकर करावे.
५. शा.वै.म.व.रू., छ. संभाजीनगर येथील महाराष्ट्र सुरक्षा बलचे एस.एस.ओ. सुरेश भाले यांची बदली करणे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबंधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199